जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 NOV 2024
लोकमत

# उद्या शिवाजी महाराज पुतळा सुवर्णमहोत्सव दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला रविवारी (दि.१) ५० वर्षे पूर्ण होत असून यानिमित्ताने विद्यापीठाच्यावतीने उद्या शनिवारी पुतळा अनावरण सुवर्णमहोत्सवदिन साजरा करण्यात येणार आहे. या पुतळ्याचे शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के व त्यांचे कुटुंबीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. शाहू सभागृहात सायंकाळी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा माहिती पुस्तिका व फलकाचे अनावरण करण्यात येणार आहे. पोवाडा व इतर कार्यक्रमही होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
सकाळ

# छत्रपती शिवरायांचा पुतळा अनावरण सुवर्णमहोत्सव शनिवारी

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळा अनावरणास रविवारी (ता. १ डिसेंबर) ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक दिवसाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठ शनिवारी (ता. ३०) दुपारी चार वाजता या पुतळा अनावरण सुवर्णमहोत्सव दिन साजरा करणार आहे.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमास दिवंगत शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि खेडकर यांचे कुटुंबीय प्रमुख उपस्थित असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित असणार आहेत. यावेळी छत्रपती शिवरायांना अभिवादन, शिल्पकार सीमा खेडकर आणि शिर्के कुटुंबीयांचा सत्कार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन आणि माहिती फलकाचे अनावरण केले जाणार आहे. पोवाडा सादरीकरण होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
पुढारी

# विद्यापीठातील शिवरायांच्या पुतळ्याचा रविवारी सुवर्ण महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीला १ डिसेंबर रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के व खेडकर यांचे कुटुंबीय उपस्थित असणार आहेत.

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा विद्यापीठात असावा, अशी भावना पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांची झाली. त्यातून दि. १ डिसेंबर १९७४ रोजी तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण केले होते. पुण्यातील शिल्पकार बी.आर. खेडकर यांनी हा पुतळा उभारला होता. शनिवारी होणाऱ्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के भूषवणार आहेत. तर प्र.कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण दिन कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा अनावरणास १ डिसेंबर रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक दिवसाच्या पूर्वसंध्येला दि. ३० रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण दिन साजरा करण्यात येणार आहे.

याप्रसंगी शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के व खेडकर कुटुंबीय उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. यावेळी शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के व बी. आर. खेडकर कुटुंबीयांचा सत्कार करण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या माहिती पुस्तिका व फलकाचे अनावरण केले जाणार आहे. शाहिरी पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
लोकमत

# सद्गुणी लोकशाहीसाठी नवे राजकारण हवे


## डॉ. सुरेंद्र जोंधळे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमध्ये मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गेल्या ७५ वर्षांत भारतीय लोकशाहीचा अवकाश घटनात्मक ते प्रातिनिधिक आणि पुढे प्रातिनिधिक ते मतदानकेंद्री असा आक्रसत गेला. या लोकशाहीचे पुनश्च सद्गुणी लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभे करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, गेल्या ७५ वर्षांत सवंग लोकप्रिय राजकारण घडविले.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आयोजित व्याख्यानात डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी मार्गदर्शन केले.

नागरिकांच्या हक्कांचा संकोच होत गेला. देशाप्रती कर्तव्याची भावना निरंतर विरळ होत गेली. अशा सामाजिक उणिवा दूर करण्यासाठी कटिबद्ध होण्याची गरज आहे. लोकशाहीचे पुनर्शोधन, पुनर्संशोधन केले पाहिजे. त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला एक व्यक्ती-एक मत यापुढील एक व्यक्ती-एक मूल्य हा प्रवास भारताला करता येऊ शकेल.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, धर्मनिरपेक्षता ही संकल्पना भारतीय संविधानाने पाश्चात्यांकडून नव्हे, तर भारतीयांची गरज म्हणून स्वीकारली. व्यक्तीचे वर्तन धर्माने नियंत्रित केलेले असू नये, तर देशाचा नागरिक म्हणून ते नियंत्रण असले पाहिजे, ही जाणीव त्यामागे आहे. डॉ. प्रल्हाद माने स्वागत केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर मतीन शेख यांनी आभार मानले.

29 NOV 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीसाठी सत्यान्वेषी राजकारणाची गरज

## डॉ. सुरेंद्र जोंधळे

कोल्हापूर : प्रतिनिधी

गेल्या ७५ वर्षांत भारतीय लोकशाहीचा अवकाश घटनात्मक ते प्रातिनिधिक आणि पुढे प्रातिनिधिक ते मतदान केंद्री असा आक्रसत गेला. या लोकशाहीचे पुनश्च सद्‌गुणी लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभे करण्याची गरज निर्माण झालेली आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.



कोल्हापूर : विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. सुरेंद्र जोंधळे.

शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते. प्रास्ताविक नेहरू अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला.

अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर मतीन शेख यांनी आभार मानले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. ओमप्रकाश कलमे, श्रीराम पवार, डॉ. नितीन माळी, डॉ. चंद्रकांत लंगरे, विलास सोयम, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

## डॉ. चौसाळकर यांचे आज व्याख्यान

विद्यापीठाच्या भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये शुक्रवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
पुण्यनगरी

# संविधानामुळे नागरिकांच्या जीवनात परिवर्तन

## शिवाजी विद्यापीठातील गट चर्चेतील सूर

**कोल्हापूर :** संविधानामुळे भारतीय नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले आहे, असा सूर संविधान साक्षरता या विषयावर झालेल्या गट चर्चेत उमटला. शिवाजी विद्यापीठमध्ये संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत या गटचर्चेचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने करण्यात आले.

डॉ. दीपा श्रावस्ती म्हणाल्या, संविधानामुळे महिलांच्या आयुष्यात परिवर्तन झाले आहे. आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर संविधानाची उपयुक्तता आहे. याचे भान महिलांमध्ये निर्माण होणे, त्याविषयी जागृत असणे म्हणजे संविधान साक्षरता आहे.

डॉ. प्रल्हाद माने म्हणाले, संविधान साक्षर असलेला नागरिकच संविधानाचे रक्षण करू शकेल. संविधानाने प्रदान केलेल्या हक्क व कर्तव्याविषयी जागृत असणे म्हणजे संविधान साक्षरता होय. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. प्रकाश पवार यांनी, संविधानामध्ये स्वातंत्र्यपूर्व सामाजिक व राजकीय चळवळीचा अर्क असल्याचे सांगितले. अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 NOV 2024 सकाळ

# ‘सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभे करावे’

कोल्हापूर, ता. २८ : गेल्या ७५ वर्षांत भारतीय लोकशाहीचा अवकाश घटनात्मक ते प्रातिनिधिक आणि पुढे प्रातिनिधिक ते मतदानकेंद्री असा आक्रसत गेला. या लोकशाहीचे पुनश्च सद्गुणी लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभे करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. सुरेंद्र जोंधळे. यावेळी डावीकडून डॉ. तानाजी चौगुले, श्रीकृष्ण महाजन, प्रकाश पवार, प्रल्हाद माने आदी.

शिवाजी विद्यापीठातील भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये ‘संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता’ या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, ‘७५ वर्षांत सवंग लोकप्रिय राजकारण घडविले. त्यातून लोकांच्या सार्वजनिक जीवनाचे अवमूल्यन झाले. नागरिकांच्या हक्कांचा संकोच होत गेला. देशाप्रती कर्तव्याची भावना निरंतर विरळ होत गेली. अशा सामाजिक उणिवा दूर करण्यासाठी कटिबद्ध होण्याची गरज आहे.’

डॉ. पवार म्हणाले, ‘धर्मनिरपेक्षता ही संकल्पना भारतीय संविधानाने पाश्चात्यांकडून नव्हे, तर भारतीयांची गरज म्हणून स्वीकारली. व्यक्तीचे वर्तन धर्माने नियंत्रित केलेले असू नये, तर देशाचा नागरिक म्हणून ते नियंत्रण असले पाहिजे, ही जाणीव त्यामागे आहे.’

ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक श्रीराम पवार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. तानाजी चौगुले, प्रकाश कांबळे, नितीन माळी, चंद्रकांत लंगरे, विलास सोयम, विद्यानंद खंडागळे, दीपा श्रावस्ती, तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. मतीन शेख यांनी आभार मानले.

# विद्यापीठ देणार 'ट्विनिंग डिग्री'

## दक्षिण कोरिया, तैवानमध्ये विद्यार्थी पाठविणार

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत आघाडीवर असलेले शिवाजी विद्यापीठ आता विद्यार्थ्यांना 'ट्विनिंग डिग्री' देणार आहे. त्याद्वारे उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने विद्यापीठाने पाऊल टाकले आहे. याअंतर्गत दक्षिण कोरिया, तैवान, आदी देशांतील विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांमध्ये काही कालावधीकरिता विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठविणार आहे.

विद्यापीठाने जागतिक पातळीवरील संशोधन, शैक्षणिक वातावरणाचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता येण्यासाठी परदेशातील काही विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करार केला आहे. आता त्यापुढे परदेशातील विद्यापीठात प्रत्यक्षात जाऊन शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला बळ देण्यासाठी ट्विनिंग डिग्री प्रोग्रॅम (विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी दोन विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांनी संयुक्तपणे प्रयत्न करणारा उपक्रम अथवा कार्यक्रम) राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांच्या एकूण क्रेडिटपैकी ३० टक्के क्रेडिट परदेशातील विद्यापीठात शिक्षण पूर्ण करुन मिळविता येतील. त्यांना ७० टक्के क्रेडिट शिवाजी विद्यापीठातून घ्यावे लागतील. ट्विनिंग डिग्रीसाठी विद्यापीठ दक्षिण कोरिया, तैवान, जपान, थायलंड, स्वीडन येथील शैक्षणिक संस्था, विद्यापीठात विद्यार्थी पाठविणार आहे. त्याबाबतचे काम इंटरनॅशनल अफेअर्स सेलच्या माध्यमातून होणार आहे. या 'ट्विनिंग डिग्री' अंतर्गत विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण घेणे, संशोधन करण्याची मोठी संधी मिळणार आहे.

> ट्विनिंग डिग्रीअंतर्गत विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन, उच्च शिक्षण आणि रोजगाराची चांगली संधी मिळणार आहे. या शैक्षणिक सत्रात किमान पाच विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी पाठविण्याची विद्यापीठाची अधिकार मंडळांच्या माध्यमातून तयारी सुरू आहे.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

### तीस विद्यार्थ्यांची तयारी

पी. एम. उषा योजनेत उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण अशी संकल्पना आहे. याअंतर्गत ट्विनिंग डिग्री प्रोग्रॅम शिवाजी विद्यापीठ राबवित आहे. त्यात तैवानमधील एनडीएचयू विद्यापीठासमवेत करार झाला आहे. त्यांच्या शिष्टमंडळाने विद्यापीठाला भेट दिली. त्यावेळी त्यांनी सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. 'ट्विनिंग डिग्री'साठी इच्छुक असलेल्या शंभर विद्यार्थ्यांची या शिष्टमंडळासमवेत बैठक झाली. त्यात तीस विद्यार्थ्यांनी परदेशात जाण्याची तयारी दर्शविली आहे. त्यात अधिकत्तर सायन्स, सोशल वर्क अभ्यासक्रमाचे विद्यार्थी असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

### 'ट्विनिंग डिग्री' म्हणजे काय ?

जो विद्यार्थी भारतीय विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेतो. त्याला देशातील अथवा परदेशातील विद्यापीठ, शैक्षणिक संस्थेत काही अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा काही भाग भारतात आणि उर्वरित भाग परदेशात पूर्ण करता येतो. आता शिवाजी विद्यापीठातील असा अभ्यासक्रम पूर्ण करणार त्यांना ट्विनिंग डिग्री देणार आहे. गुणपत्रिकेवर परदेशातील विद्यापीठाचे नाव आणि त्याने तेथे घेतलेल्या क्रेडिटचा उल्लेख असणार आहे, अशी माहिती मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
सकाळ

# 'डेटा अँड फंक्शनल नॉलेज'वर विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठ आणि नॅसकॉम यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत तंत्रज्ञान अधिविभागातील तृतीय, चतुर्थ वर्षाच्या कॉम्प्युटर तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील विद्यार्थ्यांसाठी 'डेटा अँड फंक्शनल नॉलेज' या विषयावर मार्गदर्शन शिबिर झाले.

शिबिरात विक्रेटिक टेक्नॉलॉजीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक राठी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सॉफ्ट स्कील विषयावर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिके दाखवली.

उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील असलेली तफावत साधण्यासाठी तसेच नवनवीन तंत्रज्ञाने, उद्योग विश्वाच्या गरजा विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी या प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यापुढेही असे कार्यक्रम आयोजित केले जातील, अशी माहिती प्रभारी संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांनी दिली. मार्गदर्शन शिबिराचे संयोजन डॉ. चेतन आवटी, प्रा. अमर डूम आदींनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी सेमिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व नॅसकॉम यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत तंत्रज्ञान अधिविभागातील तृतीय व चतुर्थ वर्षाच्या कॉम्प्युटर तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सेमिनार झाले. डॉ. गणेश पाटील यांनी सामंजस्य करारासाठी प्रयत्न केले. यावेळी प्रभारी संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
तरुण भारत

# नॅसकॉमतर्फे डेटा अँड फंक्शनल नॉलेजवर सेमिनार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व नॅसकॉम यांच्यातील सामंजस्य करारा अंतर्गत तंत्रज्ञान अधिविभागातील तृतीय व चतुर्थ वर्षाच्या कॉम्प्युटर तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील विद्यार्थ्यांच्यासाठी सेमिनार आयोजित करण्यात आला. नॅसकॉम संस्थेबरोबर शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार आहे. करार प्रत्यक्षात येण्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. डेटा अँड फंक्शनल नॉलेज या विषयावर विक्रेटिक टेक्नॉलॉजीचे फाउंडर अँड सीईओ अभिषेक राठी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये सॉफ्ट स्किल यावर प्रात्यक्षिके दाखवली. इथून पुढे अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातील अशी माहिती प्रभारी संचालक प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांनी दिली. डॉ. अमित आंद्रे यांचे मार्गदर्शन आयोजित केले होते. डॉ. चेतन आवटी व प्रा. अमर डूम यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2024
पुढारी

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी समीक्षा शेलार हिची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहाजी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय ज्युदो खेळाडू समीक्षा शेलारने भोपाळ, मध्य प्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी ज्युदो स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. तिची निवड अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी झाली आहे. विद्यापीठाचे



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व जिमखानाप्रमुख डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.